# 10 जानेवारी

**आजचा सुविचार :**

**“नेहमीच लहान बनून राहा प्रत्येक जण तुमच्याबरोबर बसू शकतो, आणि इतके मोठे व्हा की जेव्हा आपण उठाल तेव्हा कोणीही बसलेले नसेल.”**

**आजचे पंचांग :**

| | |
|---|---|
| वार – सोमवार | दिनांक : 10 जानेवारी 2022 |
| मास – पौष | नक्षत्र – रेवती |
| सुर्योदय – सकाळी 7.02 वाजता | सूर्यास्त सायंकाळी 6. 17 वाजता |

**आजचे दिनविशेष :**

1863 : 7 किमी लांबीच्या व सात स्थानके असलेल्या भुयारी रेल्वेची लंडनमध्ये सुरूवात झाली.
1929 : जगात अमाप लोकप्रियता मिळालेले ‘द ॲडव्हेंचर्स ऑफ टिनटिन’ हे कॉमिक प्रथमच प्रसिद्ध झाले.
1966 : भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Easy – सोपे  2) Education - शिक्षण  3) Egg – अंडे  4) Enter – प्रवेश

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) एका दिवसात किती तास असतात?

2) लीप वर्षात किती दिवस असतात?

3) भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कोणाला ओळखले जाते?

4) ज्वलनासाठी कोणत्या वायूची गरज असते?

**बोधकथा :**

## गर्विष्ठ गुलाब

एक गुलाब होता त्याला त्याच्या सौंदर्यावर खूप गर्व होता. त्याला एकाच दु:ख होते की तो काटेरी निवडूंग शेजारी वाढत होता. दररोज गुलाब त्या निवडुंगाच्या दिसण्यावरून अपमान करीत असे, पण निवडुंग शांत असे, बागेतल्या इतर रोपट्यांनी गुलाबाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण गुलाब स्वत:च्या सौंदर्याबद्दल खूपच जागरूक होता.

एकदा उन्हाळ्यात बागेतली झाडे कोरडी पडली. गुलाब कोमेजू लागला. गुलाबाने पहिले एक चिमणी तिची चोच पाण्यासाठी निवडुंग मध्ये डूबवत होती. गुलाबाला खूप लाज वाटली. तरीसुद्धा त्याने निवडूंगास विचारले, “ मला पण पाणी मिळेल का?” दयाळू निवडुंग लगेच “हो” म्हणाला आणि त्या दोघांच्या मैत्रीमुळे त्यांनी कडक उन्हाळ्याला तोंड दिले.

**तात्पर्य – कोणत्याही व्यक्तीविषयी त्याच्या दिसण्यावरून मत बनवू नका.**